बुधवार, दि ८ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक ६ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/




## युवा आदर्श कफ सिरप ...

कफ सिरपची भेसळ
आला नवीन खोकला
दोष आहे हो कुणाचा
एक दुसऱ्यांवर ढकला
मनात रुतली खदखद
कुणी भडभड ओकला
अफवांचा कफ असह्य
सर्रास जातोयं विकला
झाली कशी ती भेसळ
समोर आण रे दाखला
कडक शासन जरुरीचे
जोही गुन्ह्यांत माखला
शिंतोडे आहे अपेक्षित
हात घालताना चिखला
जालीम देऊनि उतारा
भ्रष्ट व्याधीला हाकला
समाज कंटक मातलेले
आरोग्य विभाग खोकला
असो कुणीही मुळाशी
वेळेवर जाऊ दे रोखला
भेसळ विरोध करताना
कडक कायदाही थकला
शोधून काढा हितसंबंध
रे कोण कमरेत वाकला
जाण ऋग्णांच्या वेदना
खोकून ओकून थकला
काळ जातो रे सोखला
निरपराधी प्राणामुकला

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# अतिवृष्टीग्रस्तांसाठी ३१ हजार ६२८ कोटीचं पॅकेज जाहीर

**मुंबई** - राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरकारकडून मदतीची अपेक्षा लागली असून आजच्या मंत्रिमंडळ बैठकीकडे राज्याचे लक्ष लागले होते. विशेष म्हणजे आजच शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेजची घोषणा होणार असल्याची माहिती होती, दिवाळीपूर्वीच बळीराजाच्या खात्यावर मदतनिधी जमा होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी सांगितले होते. दिवाळी सणाला अवघे काही दिवस राहिल्याने आता राज्य सरकारने अतिवृष्टीग्रस्तांसाठी अखेर मदतीचं पॅकेज जाहीर केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्र्यांनी मदत पॅकेजची घोषणा केली. त्यानुसार, ज्या शेतकऱ्यांची जमीन अतिवृष्टीच्या पाण्यात वाहून गेली, त्यांना हेक्टरी ३.४७ लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. तसेच, अतिवृष्टीग्रस्तांसाठी तब्बल ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे मदतीचे पॅकेज जाहीर करण्यात आलं आहे.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी अतिवृष्टी पाहणी दौरा केला, तेव्हापासून मदतीच्या पॅकेजची लवकरच घोषणा होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. त्यातच, राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी विरोधकांकडून होत आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही हीच मागणी केली असून महाविकास आघाडीतील सर्वच पक्ष शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी करत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांसाठी मोठ्या पॅकजेची घोषणा केली असून सर्वांनाच मदत होईल, असे प्रयत्न सरकारचे या पॅकेजमध्ये दिसून आले आहेत. शेतकरी, नुकसानग्रस्त घरे, जमिनी आणि जनावरांच्या नुकसानीसाठीही भरीव मदत देण्याचा शासनाचा निर्णय आहे.

शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेलं हे आत्तापर्यंतचं सर्वात मोठं पॅकेज आहे. शेतकरी रब्बीचे पिक घेतोय की नाही हे विचारत न घेता आम्ही १० हजार रुपयांची मदत करत आहोत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज सकाळीच फोन केला. विम्या संदर्भात बैठक घेत तातडीनं योग्य मदत दिली पाहिजे यासाठी सरकार दबाव आणेल, व्हॅलिडेशनसाठीही आता आपण प्रयत्न करतोय. शेतकऱ्यांना मदत करायची आहे तर ताण सहन करावा लागेल, इतकी अतिवृष्टी होईल याची कल्पना नव्हती. काही बाबींवर ताण सहन करावा लागेल, आत्ताच सांगता येत नाही. पण, शेतकऱ्यांना तात्काळ पैसे देणं सुरु करतोय, कुठे कमी करायचं आणि वाढवायचं हे डिसेंबच्या अधिवेशनात बघू, असेही फडणवीसांनी म्हटलं.

राज्यात अतिवृष्टीमुळे ६८ लाख हेक्टर इतक्या जमिनीवरील पिकांचे नुकसान झालं आहे, साधारणपणे जास्तीचं नुकसान २९ जिल्ह्यात झालं असून आपण २५३ तालुके सरसकट घेतले आहेत. त्यामध्ये, २ हजार ५९ मंडळं आहेत, जिथं ६५ मिमीची अट ठेवलेली नाही. त्याठिकाणी सरसकट मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. येथे सर्व प्रकारची मदत करण्याचा प्रयत्न आपण करतोय, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

मराठवाड्यातील परभणी, वाशिम, जालना, यवतमाळ या जिल्ह्यात ५० टक्क्यांहून अधिक नुकसान झालं आहे. संभाजीनगरमध्ये ७५ टक्क्यांहून अधिक नुकसान आहे, तर सोलापूर धाराशिवमध्ये ८० टक्क्यांहून अधिकचं नुकसान आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त पैसा दिवाळी पैसे आधी देता येईल, यासाठी प्रयत्न राहिल. मृत व्यक्तींचे सहाय्य आधीच दिले आहेत. काही गोष्टी ज्या राहिल्या आहेत, त्या दिवाळी आधीच देण्याचा प्रयत्न करणार आहोत. जवळपास १८ हजार कोटींपेक्षा **पान ३ वर**

### महानगरपालिकेत खासदार डॉ. कल्याण काळे यांची आढावा बैठक

# शहरातील विकासकामांना गती देण्याचे निर्देश

**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिका कार्यालयात खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत शहरातील विविध विकासकामे, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण, तसेच तलावांच्या दुरुस्तीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत घाणेवाडी तलावाच्या दुरुस्ती व देखभाल संबंधी सूचना देण्यात आल्या. शासनाने या तलावाची मालकी महानगरपालिकेला दिल्याने आता मनपाच्या नावाने सातबारा उताऱ्यात इतर हक्कात नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे तलावातील गाळ काढण्याचे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे निर्देश खासदारांनी दिले.

तसेच मोती तलावाचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याची सूचना करण्यात आली.अतिवृष्टीमुळे मोती तलावाचेव कुंडलिका - सीना नद्यांचे पाणी शहरात घुसल्याने नागरिकांचे व व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे भविष्यात अशी परिस्थिती निर्माण



होऊ नये म्हणून सांडव्याचे काम तातडीने पूर्ण करावे व नद्या अतिक्रमण मुक्त कराव्या तसेच नॅशनल हायवे अधिकाऱ्यांशी समन्वय साधून तलावाजवळील रस्त्याची उंची वाढवावी, असे निर्देश खासदार काळे यांनी दिले.

यावेळी कुंडलिका व सीना नदीपात्रातील रेड व ब्लू लाईन मार्किंग, तसेच अतिक्रमण हटविण्याबाबत ठोस कारवाई करण्याची सूचना देण्यात आली.

शहरातील पथदिवे नियमित सुरू ठेवणे, मनपा व झालर क्षेत्रातील डी.पी. रोडवरील अतिक्रमण हटविणे, तसेच शहरातील ३०० हून अधिक ओपन स्पेसवरील अतिक्रमण काढून मनपाने ताबा घ्यावा, अशा सूचनाही देण्यात आल्या.

रमाई घरकूल योजनेतील लाभार्थ्यांना निधी वेळेवर मिळत नसल्याने संबंधित **पान ३ वर**

## संपादकीय

# इच्छाशक्ती आणि कृतीशील प्रशासनाची गरज

शहराच्या वाढत्या नागरी समस्यांवर तोडगा काढण्यासाठी जालना महानगरपालिकेत सोमवारी झालेल्या बैठकीने एक सकारात्मक दिशा दिली आहे. शहर विकासाच्या आराखड्याला ठोस स्वरूप देण्यासाठी खासदार, आयुक्त, उपायुक्त, अधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी एकत्र बसले - हेच स्वतःमध्ये आशादायक लक्षण आहे. या बैठकीत झोनल पद्धतीची अंमलबजावणी, पोल शिफ्टिंग, रस्ते दुरुस्ती, राजमहल-दरगाह वेस रोडवरील अपूर्ण कामे, तसेच राजमहल ते बायपासकडे जाणाऱ्या पुलाच्या पुनर्बांधणीचा प्रश्न यावर सविस्तर चर्चा झाली. या सर्व विषयांचा थेट संबंध नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे गट) शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांनी या बैठकीत जी भूमिका घेतली, ती लोकप्रतिनिधीच्या कर्तव्याची जाणीव करून देणारी होती. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, शहर वाढत असताना प्रशासनाने जुन्या चौकटीत राहून काम केल्यास नागरिकांना त्रास होईल. त्यांचा प्रस्ताव - प्रत्येक प्रभागात झोनल कार्यालये उभारल्यास नागरिकांना आपल्या भागातील समस्या स्थानिक पातळीवर सोडवता येतील - हा आधुनिक शहरी प्रशासनाचा पाया आहे. महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांनी या मागण्यांकडे सकारात्मकतेने पाहिले, हे उल्लेखनीय आहे. त्यांनी ‘हेल्पलाइन नंबर’ सुरू करण्याची घोषणा, तसेच ‘तक्रारनिवारण दिन’ दर महिन्याच्या शेवटच्या सोमवारी घेण्याचा निर्णय जाहीर केला. ही केवळ घोषणा नसून नागरिक-केंद्रित प्रशासनाच्या दिशेने उचललेले ठोस पाऊल आहे. जालना शहर सध्या पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, वाहतूक कोंडी, अपुरी रस्ते सुविधा आणि सार्वजनिक प्रकाशयोजना या मूलभूत अडचणींशी झुंज देत आहे. प्रशासनाकडे निधी आहे, योजना आहेत - पण समन्वयाचा अभाव आणि कामाच्या वेळापत्रकाचे पालन न होणे ही समस्या दीर्घकाळ अधांतरी ठेवते. या पार्श्वभूमीवर, खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बैठकीत दिलेला स्पष्ट निर्देश - शहर विकासाच्या प्रत्येक योजनेत नागरिकांचा सहभाग असावा आणि कामे वेळेत पूर्ण झाली पाहिजेत - हे प्रशासनासाठी एक जबाबदारीचे स्मरण आहे. या बैठकीत पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी ‘जालना शहराचा सर्वांगीण विकास’ हे ध्येय मांडले, हे निश्चितच प्रशंसनीय आहे. विकास ही कोणत्याही पक्षाची मक्तेदारी नसून, ती सामूहिक जबाबदारी आहे. राजकारणातील स्पर्धा जर ‘कामात गती’ आणेल, तर ती लोकशाहीसाठी आरोग्यदायी ठरेल. जालना शहराचा विकास आराखडा कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरवण्यासाठी तीन घटक अनिवार्य आहेत राजकीय इच्छाशक्ती, प्रशासनिक तत्परता, आणि नागरिकांचा सहभाग. शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांनी नागरिकांच्या भावना स्पष्टपणे मांडल्या आणि आयुक्त खांडेकर यांनी त्या समजून घेत ठोस कृतीची दिशा दाखवली - ही जोडी जर सातत्याने कार्यरत राहिली, तर जालना शहर सुशोभित, सुव्यवस्थित आणि नागरिककेंद्रित होईल यात शंका नाही. जालना शहर आज एका वळणावर उभे आहे, एकीकडे वेगाने वाढणारे शहरीकरण आणि दुसरीकडे अपूर्ण नागरी सुविधा. या परिस्थितीत, राजकीय दूरदृष्टी आणि जबाबदार प्रशासन यांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच शहर विकासाचा खरा आराखडा साकार होऊ शकतो. महानगरपालिकेने घेतलेली बैठक हा प्रारंभ आहे; आता त्या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते, हेच शहराच्या भविष्यास ठरवेल.

## भारताचा संरक्षण दलाचा मानबिंदू; भारतीय वायू दल

दरवर्षी ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय वायुसेना दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो. यावर्षी आपण आपला ९३ वा वायुसेना दिन साजरा करत आहोत. भारतीय वायू सेनेचे महत्व लोकांना कळावे आणि लोकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस साजरा केला जातो. भारतीय वायुसेना ही भारतीय संरक्षण दलांच्या पाच मुख्य विभागांपैकी एक असून तिच्यावर भारताच्या वायुक्षेत्राचे रक्षण करण्याची व भारतासाठी हवाई युद्ध करण्याची जबाबदारी आहे. भारतीय हवाई दल जगातल्या पहिल्या पाच उत्कृष्ट दलातील एक मानले जाते. ८ ऑक्टोबर, १९३२ रोजी भारतीय वायुसेनेची स्थापना युनायटेड किंगडमच्या रॉयल एअरफोर्स ची सहाय्यक कंपनी म्हणून करण्यात आली. भारतीय वायुसेनेने पहिले स्क्वाड्रन तयार केले आणि ८ ऑक्टोबरला ते मिशन पूर्ण केले. त्यानंतर वायुसेनेने अनेक पराक्रम केले. अल्पावधीतच भारतीय वायुसेना जगातील सर्वात शक्तिशाली वायुसेना बनली. तेव्हापासून ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय नौसेना दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी हवाई दलात योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान केला जातो. यादिवशी भारतीय वायू सेनेकडून परेड, एअर शो सादर केले जातात. मागील वर्षी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या योद्ध्यांना या दिवशी पुरस्कार दिला जातो. त्यांचा यथायोग्य सन्मान केला जातो. सुब्रोतो मुखर्जी हे भारतीय वायू दलातील स्क्वाड्रनचे पहिले प्रमुख होते. १२ मार्च १९४५ रोजी वायुदलाचे नाव रॉयल इंडियन एअर फोर्स झाले. सुरुवातीला भारतीय वायुदलाकडे खूप कमी विमाने आणि साधनसामुग्री होती. १९४७ मध्ये विमानांना पिस्टनवर चालणारी इंजिने बसवलेली असत. जेट इंजिनांच्या आगमनानंतर त्याची जागा वेगवान जेट विमानांनी घेतली. प्रथम नॅट, हंटर, कॅनबेरा यासारखी ब्रिटिश बनावटीची विमाने वायुसेनेत सहभागी केली गेली. त्या नंतर तंत्रज्ञानाच्या कसोटीवर त्यांची जागा फ्रेंच बनावटीच्या विमानाने घेतली. भारतीय परराष्ट्र धोरणामुळे आणि रशियाने उत्तम सहकार्य केल्याने दणकट बनावटीची रशियन बनावटीची लढाऊ आणि मालवाहू विमाने सहभागी करण्यात आली. तसेच रशियन हेलिकॉप्टर्स सहभागी करण्यात आली. सद्य काळात आधुनिक रडार यंत्रणा, क्षेपणास्त्रे, दळणवळण यंत्रणा, नेटवर्क सेंट्रिक वॉरफेअर सी-४ आय ही संगणक प्रणाली वायुसेनेकडे आहेत. हवेतल्या हवेत इंधन पुरवठा करणारी विमाने, विमानातून रडार वापरून दूर अंतरावरील शत्रूच्या विमानांची टेहळणी करणारी यंत्रणा, कक्षेबाहेरील शत्रूच्या ठिकाणाचा वेध घेणारी इत्यादी अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रे सेनेत सहभागी करण्यात आली आहेत. आज भारतीय वायू दल जगातील सर्वात शक्तिशाली वायू दल समजले जाते. भारतीय वायू दल जातील चौथ्या क्रमांकाचे सामर्थ्यशाली वायू दल आहे. अमेरिका, रशिया आणि चीन पाठोपाठ भारताचेच वायू दल सर्वात मोठे वायू दल आहे. भारतीय वायू दलाची कामगिरी १४५ कोटी भारतीयांना अभिमान वाटावी अशी दैदिप्यमान आहे. ज्या ज्या वेळी देशाकडे शत्रूने वाकड्या नजरेने पाहिले त्या त्या वेळी भारतीय वायू दलाने उत्तुंग कामगिरी करून शत्रू राष्ट्राला दाती तृण धरायला लावले. १९४७/४८, १९६२, १९६५, १९७१, १९९९ साली झालेले कारगिल युद्ध किंवा नुकतीच झालेली ऑपरेशन सिन्दुर मोहीम या सर्व युद्धात भारतीय वायू दलाने महत्वाची भूमिका बजावली. भारतीय वायू दल हा भारतीय संरक्षण दलाचा मानबिंदू आहे. भारतीय वायू दल दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे.**

# आनंदाचा शिधा हरपला...!

## शिधा थांबवून सरकारने त्यांचा उद्याचा आत्मविश्वास कमी केला

सरकारच्या हाती गरिबांच्या आयुष्यात 'आनंदाचा शिधा' नावाची छोटीशी, पण हृदयाला दिलासा देणारी मूठ होती. नावातच आपुलकी होती. जणू तांदळाच्या पोत्यात सरकार स्वतःचा हात पुढे करून म्हणतंय, घे, हे तुझं हक्काचं आहे. हा शिधा केवळ मोफत गहू-तांदूळ नव्हता. तो होता एक भावनिक आधार, गरिबांच्या ओंजळीतला आशेचा ठेवा. आणि आज तो सरकारने शांतपणे काढून घेतला. कुठेही गाजावाजा नाही, कोणताही जाहीरनामा नाही.

शिधा म्हणजे केवळ मोफत आतांदळ-गह नव्हे. ती होती एक सामाजिक बांधिलकीची खूण. आणि ही खूण आता सरकारने गुपचूप पुसून टाकलीय. एका सरकारी बैठकीत आनंदाला उठवून लावण्यात आलं. आणि ही बातमी आलीही अशी, जणू काही तांदळाचं भाव थोडंसं वाढल्यागत. मूलभूत गरजांमध्ये अन्नावरचा हक फार प्राथमिक असतो. आणि तो सरकारने दिला तर तो केवळ दयेचा डाव नव्हे, तर तो एक मानवी अधिकारच मानला जातो. पण आजच्या निर्णयात ना तसा अधिकार, ना तशी संवेदनशीलता. कोणत्याही निवेदनात, मंत्र्याच्या वक्तव्यात किंवा सरकारी संकेतस्थळावर 'आनंदाचा शिधा बंद करतोय' असं जाहीर केलं नाही. पण रेशन दुकानांच्या रांगेत उभ्या असलेल्या बाईला, तिच्या शेजारच्या वयोवृद्ध गृहस्थाल, किंवा नुकत्याच लग्न झालेल्या कुटुंबाला आता हे समजतंय की, सरकारचा 'आनंद' संपलाय.




आनंदाचा शिधा ही योजना केवळ अन्नधान्य पुरवणारी नव्हती. ती होती एक संकेत. गरीब कुटुंबाच्या आयुष्यात सरकारचा एक हात पोहोचतोय, ही भावना त्या पिशवीतून घरात उतरायची. खऱ्या अर्थानं, तो 'आनंद' होता गरिबांसाठी. कारण ज्यांच्या अंगणात रोजच्या जेवणाचा प्रश्न असतो, त्यांच्यासाठी मोफत किंवा सवलतीच्या दरातला शिधा म्हणजे आश्वासक भविष्याचं छोटं पाऊल. आणि हे पाऊल आता मागे घेतलं गेलंय. या निर्णयामागे तर्क आहेत. खर्च वाढतोय. केंद्र सरकारने अन्नसुरक्षा कायद्यानुसार दिलेलं मोफत धान्य मिळतंय, राज्याचा निधी कमी आहे, इत्यादी. हे सारे व्यवस्थापन' प्रकारातले मुद्दे, पण प्रश्न व्यवस्थेचा नाही, तो दृष्टिकोनाचा आहे. एकीकडे शाश्वत विकास म्हणत सरकार पायाभूत सुविधा वाढवतंय, ग्रीन हायवे, मेट्रो, नवीन विमानतळ उभारतोय. आणि दुसरीकडे, ज्यांना दोन वेळचं जेवण देणं हा सरकारचा आद्य कर्तव्याचा भाग होता, त्यांच्याकडून आनंदाचा हक्क काढून घेतलाय. गरिबांसाठी असलेल्या योजना हळूहळू बंद करायच्या. आणि त्यावरच 'सबका साथ, सबका विकास' असं लिहायचं, हे आपल्या राजकीय व्यवस्थेचं एक नविन झालंय. नावात समीकरण योजनांच्या 'आनंद' असतो, पण अंमलबजावणीत तो हरवतो. मग तो पाणी फाऊंडेशनचा उपक्रम असो, की अन्य योजना, की आनंदाचा शिधा. काही काळ गाजतात, प्रचारात येतात आणि मग शांतपणे विस्मृतीत जातात. कोणताही अधिकारी, मंत्री, किंवा योजना संकल्पक याची जबाबदारी घेत मोठी पोकळी आहे. योजनांचं मूल्य केवळ आकडेवारीत मोजता येत नाही. ते मोजता येतं आयुष्यांमध्ये, त्यांच्यात घडणाऱ्या बदलांमध्ये. आनंदाचा शिया ही अशा बदल घडवणारी योजना होती. रेशनच्या पोत्यात मिळणाऱ्या त्या दोन-चार गोष्टी केवळ

वस्तू नव्हत्या, त्या आशेच्या खुणा होत्या. त्या बंद झाल्याचं दुःख केवळ उपासमारीचं नाही, तर दुर्लक्षित केलं गेल्याचंही आहे. आनंदाचा शिधा हा एकप्रकारे गरिबांच्या चेहऱ्यावरचा हसू देणारा लहानसा गोड मोती होता. एक कुटुंब त्यातला काही भाग मिळवून, जोपर्यंत मिळवलेलं असतं, तोपर्यंत आशेच्या दृषटिकोनातून जगत असायचं. त्यातील काहीतरी त्यांच्या पोटात जातं, आणि काहीतरी त्यांच्या मनात आशा निर्माण करतं. 'आनंद' केवळ शिधात नाही, तर त्या प्रत्येक गोष्टीत सामावलेला होता. सरकारने त्याला रह करत, केवळ आर्थिक विचार केला. पण त्यात तो सर्वांचा जीवनाचा काहीतरी भाग हरवला आहे. गरिबांवरची ही उधळलेली हलकीची ताणतणाव, कुटुंबाच्या आशेच्या लहानशा किडकिडीत सूक्ष्मांकांचं हरवणं हे त्यांनाही समजतंय. हा निर्णय निवडणुकीच्या तोंडावर घेतलेला नाही, हे खरं. पण यामुळे एक गोष्ट स्पष्ट होते, गरिबांचा आवाज हो मतपेटीवर परिणाम करणारी गोष्ट उरलेली नाही. कारण गरिबांचं मत सुरक्षित आहे किंवा अप्रभावी. म्हणूनच त्यांच्या शिध्यावर गदगदीत सरकारचा पहिला घाव बसतो. या पार्श्वभूमीवर, 'आर्थिक जबाबदारी 'चा दाखला देत जर सरकार गरीबांचा शिधा कमी करत असेल, तर ती केवळ बचत नव्हे, तर बेदिली आहे.

गरिबीची संकल्पना आज फक्त आकड्यांमध्ये सापडते. पण ती रोज जगणं असते. एका दिवसाचं तांदूळ, चार दिवसांची डाळ, आणि महागाईच्या काट्यावर जमवलेली कुटुंबाची गणितं. आनंदाचा शिधा हा त्या गणितांचा एक छोटासा स्थिरांक होता. आता तो गेला. सरकारने काहीतरी कमी केलं आहे, हे गरीबांच्या ऑजळीतून निसटलेलं दिसतं. पण सरकारला वाटतं, त्यांनी केवळ शिधा थांबवला आहे. खरंतर त्यांनी 'आनंद' हरवला आहे, गरिबांच्या आयुष्यातील 'आनंद' म्हणजे केवळ पोटभर अन्न नव्हे, तर त्या अन्नातून निर्माण होणारी सुरक्षिततेची भावना.

शिधा थांबवून सरकारने त्यांचा उद्याचा आत्मविश्वास कमी केला आहे. उद्या सकाळी घरात काय शिजवायचं, हा प्रश्न पुन्हा कुटुंबाच्या डोक्यावर कोसळतोय. हे केवळ भुकेचं संकट नाही, तर मानवी सन्मानाचं अपमान आहे. कारण गरीबाला मिळणारा प्रत्येक कण हा केवळ भाकर नव्हे, तर जगण्याची खात्री असते. ती खात्री सरकारने हिरावून घेतली, याचं राजकारणात मोजमाप होणार नाही. पण समाजाच्या रगांमधून हळूहळू उसळणारा असंतोष, हीच खरी किंमत ठरणार आहे. शासनाने हरवलेला हा 'आनंद' पुन्हा उगवण्यासाठी आता प्रश्न केवळ सरकारचा नाही, तर संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेचा आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# नेर जिल्हा जालना अतिवृष्टीग्रस्त क्षेत्रांचा शेतकरी विकास मंच व जमाअत-ए-इस्लामी हिंद दौरा

**जालना । प्रतिनिधी -** जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्रचे उपाध्यक्ष जमीर क़ादरी , सचिव अब्दुल मुजीब आणि शेतकरी विकास मंच महाराष्ट्रचे अध्यक्ष हुसैन खान यांच्या नेतृत्वाखाली जालना तालुक्यातील नेर परिसरात अतिवृष्टीग्रस्त भागाचा दौरा करण्यात आला.

या भागात अलीकडील कालावधीत झालेल्या प्रचंड पावसामुळे शेतात अजूनही पाणी साचलेले असून खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना गंभीर आर्थिक फटका बसलेला आहे.

शेतकरी विकास मंच महाराष्ट्रतर्फे प्रशासनाकडे खालील मागण्या करण्यात आल्या: प्रत्येक पीडित शेतकऱ्याचा पंचनामा तातडीने व काटेकोरपणे करण्यात यावा. शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची रक्कम वेळेत मिळावी. प्रत्येक पीडित शेतकऱ्याला रु ५०,००० प्रती हेक्टर नुकसानभरपाई द्यावी. रब्बी हंगामासाठी बी-बियाणे व खताची त्वरित व्यवस्था करण्यात यावी. सर्वेक्षण व म दतकार्यात गती आणण्यात यावी.



सद्यस्थितीत शेतकरी विकास मंच नेर शाखेने ६0 शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण केले आहेत. दौऱ्यादरम्यान शिष्टमंडळाने नेर ग्रामपंचायतीचे सरपंच यांची भेट घेऊन परिस्थितीची माहिती घेतली. सरपंचांनी ४५% क्षेत्र अनावर असल्याचा अहवाल शासनाकडे सादर केल्याची माहिती दिली व शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले.

शेतकरी विकास मंच महाराष्ट्रकडून चार अत्यंत गरीब शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीसाठी एकूण रु १६,००० ची आर्थिक मदत वितरित करण्यात आली.

या दौऱ्यात शेतकरी विकास मंच नेर चे अध्यक्ष शेख युसुफ, उपाध्यक्ष हरीभाऊ शिंदे तसेच जमाअत-ए-इस्लामी हिंद नेर चे स्थानिक अध्यक्ष अमान खान व पदाधिकारी व जबाबदार उपस्थित होते.

# परतूर व्यापारी महासंघाच्या वतीने पोलीस निरीक्षक यांना निवेदन



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील रेल्वे स्टेशन ते आंबा रोड पर्यंतचे रोडवर असणारे अनाधिकृत हातगाडे व वाहतूकीस अडथळा निर्माण करणारे अतिक्रमण हटविण्यात यावी.सदर निवेदनाद्वारे कळविण्यात येते की मुख्य रस्त्यावर बेकायदेशीर हातगाडे उभे राहतात. यामुळे पुढील अडचणी निर्माण होत आहेत. नागरिक व ग्राहक यांना त्रास सहन करावा लागतो, मुख्य रस्त्यावर नेहमीच वाहतुकीची कोंडी होताना दिसत आहे, ग्राहकांना दुकानात सहजपणे येता जाता येत नाही. दुकान मालक व बेकायदेशीर गाडीवाले यांच्यामध्ये सतत भांडण व वादविवाद निर्माण होत आहेत. अशीच एक घटना दि.0२/१0/२0२५, रोजी मोंढा परिसरात घडली या घटनेने मारहाणी प्रकरणी वाद निर्माण झाला असून रस्त्यावर बऱ्याच वर्षापासून हात गाडे लावून ठेवलेले आहेत. त्यामुळे व्यापारी वर्ग व नागरिकांना त्रास होत आहे वरील परिस्थिती लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले यावर तात्काळ कारवाई करून मुख्य रस्त्यावर बेकायदेशीरअसलेले गाडे हटवावेत तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक ती कायमस्वरूपी पावले उचलावीत. गोविंद मोर, राजेंद्र मस्के, राजेभाऊ कांदे , आश्विन दायमा, दिनेश होलाणी, अनिल वाशिंबे, नारायण मुंदडा, नरपत जांगिड, राहुल सातोणकर, रोहित पोरवाल, अविनाश शहाणे, संतोष शिंदे, वैभव सोमानी, दत्ता तनपुरे, जगदीश झंवर, अशोक राजपुरोहित, विठ्ठल झोरे,या निवेदनावर व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## आरोग्य योजनेचा रुग्णांना परतूरातच मिळणार लाभ!

# रामकृष्ण हॉस्पीटलमध्ये सेवा सुरु

**परतूर । प्रतिनिधी -** शासनाच्या अनेक आरोग्य योजना विचार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य व पंतप्रधान जन आरोग्य योजना अंतर्गत विविध आजार व उपचारासाठी शासनाच्या वतीने पाच लाखापेक्षा जास्त मदत रुग्णांना केली जाते. मात्र आजवर परतुर मतदारसंघातील व ग्रामीण भागातील रुग्णांना या योजनेचा प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठी जालना छत्रपती संभाजीनगर या शहरी दवाखान्यातच उपचारासाठी जावा लागत होते व याचा प्रत्यक्ष लाभ शहरी दवाखान्यातच उपलब्ध असल्याने ग्रामीण रुग्णालयाची नेहमी तारांबळ उडायची. म्हणून परतूरला देखील ही योजना एखाद्या रुग्णालयात का होईना हि योजना चालू करावी अशी परिसरातील रुग्णांची मागणी गेल्या अनेक वर्षापासून होती. अखेर या मागणीला यश मिळत येथील डॉक्टर रामकृष्ण हॉस्पिटल मध्ये शासनाच्या या सर्व सुविधा उपलब्ध झाले असून आजपासून ग्रामीण रुग्णालयाला शहरी भागातल्या जातात परतूर शहरात सेवा मिळणार आहे व उपचारासाठी शासनाकडून अनुदान भेटत असल्याने सर्व नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. याबाबत रामकृष्ण हॉस्पिटलचे ज्ञानेश्वर शिंदे यांनी सदरील माहिती दिली. शासनाच्या या सर्व आरोग्य योजना त्यांच्या दवाखान्याला आजपासून लागू झाले असून यात अनेक आजारावर शासनाच्या विकसनुसार विकसनुसार अनुदान प्राप्त होऊन ग्रामीण रुग्णांना मोफत उपचार करता येणे आता शक्य होणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. स्पेशल



अति दक्षता विभागासह शस्त्रक्रिया सह अनेक उपचार त्यांच्या दवाखान्यामध्ये केली जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. या योजनेचा फायदा घेत. अधिक माहितीसाठी आमच्या कक्ष विभागाशी संपर्क साधण्याचे डॉक्टर ज्ञानेश्वर शिंदे यांनी यावेळी आवाहन केले आहे.

# सत्यशोधक विद्यालयात ज्ञानवंत गुणवंत इतिहास सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा संपन्न

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** मानव विकास व पूर्ण निर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना शाळेमध्ये मी ज्ञानवंत गुणवंत यशवंत या उपाक्रमांतर्गत इतिहास विषयाशी संबंधित सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा पार पडली या स्पर्धेमध्ये इयत्ता पाचवी ते बारावी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला शाळेतील इतिहास शिक्षक श्रीमती लकडे मॅडम प्राथमिक इतिहास शिक्षक श्री गरुड सर तसेच माध्यमिक इतिहास शिक्षक श्री जाधव सर यांनी ही स्पर्धा आयोजित केली होती. संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य श्री सुनीलजी वाकेकर साहेब तसेच संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्री ताई बनकर मॅडम यांच्या कल्पकतेतून हा उपक्रम संपन्न करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थिती लाभली.

पान १ वरुन

## अतिवृष्टीग्रस्तांसाठी ...

अधिक पैसे क्रॉप कम्पेन्शेसनमधून आम्ही देतोय. चार पैसे आम्ही कमी खर्च करु आणि मदत करू, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. तसेच, मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आम्हाला पैसे दिले आहेत, काहींनी सीएसआर देण्याचे मान्य केले आहे. शिक्षणाचा प्रश्न निर्माण होऊ नये ते यातून खर्च करू असा प्रयत्न राहिल, अशी माहितही फडणवीसांनी दिली. राज्यात मराठवाड्यासह विविध जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीग्रस्तांसाठी राज्य सरकारकडून ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार, जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ४७ हजार रोख नुकसान भरपाई आणि हेक्टरी ३ लाख नरेगाच्या माध्यमातून देण्यात येईल. त्यामुळे, जवळपास हेक्टरी साडेतीन लाख रुपये मदत शेतकऱ्यांना मिळणार आहे.

दुधाळ जनावरांना ३७ हजार रुपयांपर्यंत मदत, गाळ भरलेल्या विहिरींसाठी ३0 हजार, कुकुटपालनाला १00 रुपये प्रति कोंबडी, नष्ट, पडझड झालेली घरं नव्याने बांधण्यासाठी मदत, डोंगरी भागातील घरांना १0 हजारांची अधिकची मदत, झोपड्यांची मदत, गोठा, दुकानदार यांना ५0 हजार मदत करणार, विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी करणार, पीक नुकसानभरपाई, शेतकऱ्यांना रब्बीचे पीक घेता आले पाहिजे यासाठी प्रति हेक्टरी १0 हजार रुपये,

हंगामी बागायती शेतीनुकसान भरपाई - हेक्टरी २७ हजार रुपये, बागायती शेती नुकसान भरपाई - हेक्टरी ३२ हजार रुपये, विमा व्यतिरिक्त शेतकऱ्यांना हेक्टरी १७ हजार रुपये, कोरडवाहू शेतकऱ्यांना ३५ हजार, बागायती शेती ज्यांनी विमा उतरवला असेल त्यांना ५0 हजारांहून अधिक मदत मिळेल. दोन हेक्टरपर्यंत एनडीआरएफ आणि केंद्राचे नॉर्म्स असतात, त्यावरील भार आम्ही उचलला आहे. बारकाईने विचार करत कोणताही घटक वंचित राहणार नाही असा विचार केलाय. भौगोलिक परिस्थिती वेगळी असते, जर काही राहून गेलं तर त्याचा समावेश करण्याची देखील आमची तयारी आहे, अशी माहिती यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

शेतकऱ्यांसमोरील संकट मोठं होतं, प्रत्यक्ष बांधावर जात आम्ही नुकसान पाहिलं. त्यामुळे, तात्काळ १0 हजार रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. जवळपास ६५ लाख हेक्टर जमीन नुकसानग्रस्त झाली आहे. शेतकऱ्यांवरील संकट मोठं होतं, आम्ही इतका मोठा पाऊस पाहिला नाही. प्रसंग मोठा होता, अशात आमच्या बैठका झाल्या आणि महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी राहिले आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले. विरोधक एवढं पॅकेज द्या तेवढं पॅकेज द्या असं सांगत होते, आम्ही कर्तव्य भावनेतून सर्व सांगितलं आहे. उभी पिकं आडवी झाली होती, जमिनी कापल्या गेल्या आहेत. पशूधन वाहून गेलं, जिवितहानी झाली आहे, अशा प्रसंगात शेतकऱ्यांना मदत करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही, असं भाष्य आम्ही केलं होतं. अशात मदत करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे, ही अंतिम मदत नाही, शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलू नये, शासन खंबीरपणे आपल्या पाठीमागे उभे आहे, असेही शिंदेंनी म्हटले. तामिळनाडू आणि पंजाबपेक्षा अधिक मोठं आमचं पॅकेज आहे, शेतकऱ्यांना काय हवं आहे? त्यापेक्षाही अधिक मदत होईल असा प्रयत्न आम्ही केलाय. जमीन पूर्वव्रत करणं सोपं नाही. मदतीच्या पॅकेजमध्ये गाळ भरलेला असेल तर त्यातही सहकार्य करणार आहोत. २ हेक्टरची मर्यादा आहे ती काढा अशी मागणी होती, तर आम्ही ती मर्यादा वाढवली आहे. पिक विम्याची रक्कम देखील ड होणार आहे, असेही शिंदेंनी सांगितले. जे जे उपाय करता येतील ते आम्ही करणार आहोत, सर्व निकष बाजूला ठेवत शेतकरी केंद्रबिंदू ठेवला आहे. कितीही ओढाताण असली तरी शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. एनडीआरएफ व्यतिरिक्त अतिरिक्त १0 हजार मदत आपण करणार आहोत. गृहमंत्री अमित शाह आले तेव्हा त्यांना आपण विनंती केली होती. केंद्राची मदत देखील झाली पाहिजे असं सांगितलं होतं, महाराष्ट्र सरकारच्या मागे केंद्र सरकार उभं राहिलं. यावेळचं संकट बघता राज्य सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. ज्या पद्धतीचे नुकसान झाले आहे, त्यात मदतीचा हात सरकार देईलच, सरकार हात आखडता घेणार नाही. शेतकरी आपला मायबाप आहे, त्यांचे अश्रू पुसण्याचे काम आपण करू, असेही एकनाथ शिंदेंनी म्हटले.

## शहरातील विकासकामांना...

अभियंत्यावर कारवाई करण्याचे निर्देश खासदारांनी दिले. तसेच जन्म व मृत्यू नोंदणीसाठी आकारले जाणारे प्रति वर्ष १00 रुपये शुल्क कमी करण्याबाबतही सूचना करण्यात आली.

भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण, अतिक्रमण हटविणे, कचरा व्यवस्थापन सुधारणा आणि पाणीपुरवठा नियमितता यांसारख्या विषयांवरही सविस्तर चर्चा झाली. खासदारांनी सांगितले की, २ ते ३ महिन्यांत पुढील आढावा बैठक आयोजित करण्यात येईल, तोपर्यंत महानगरपालिकेने सर्व समस्यांवर समाधानकारक कार्यवाही करून अहवाल सादर करावा.

या बैठकीस जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना (उबाठा) जिल्हाध्यक्ष भास्करराव आंबेकर, कल्याण दळे, नंदाताई पवार, बंदर चाऊस, संजय मुथा, राजेंद्र गोरे, नरेंद्र मित्तल, रऊफ परसुवाले, अंकुशराव राऊत, विनोद यादव, अकबर खान, इब्राहीम शेख, सीताराम अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

# आ. बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन

## डॉ. कृष्णा कोरडे यांच्यासह डॉक्टरांची मोठी फौज करणार तपासणी

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर मतदारसंघात आरोग्यसेवेचा संदेश घराघरांत पोहोचविण्याच्या उद्देशाने आमदार मा. बबनराव लोणीकर साहेब यांच्या संकल्पनेतून एक भव्य महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर दिनांक ९ ऑक्टोबर २०२५, गुरुवार रोजी जिल्हा परिषद शाळा, लोणी खुर्द येथे होणार असून शिबिराचा प्रारंभ सकाळी १० वाजता करण्यात येईल.

या शिबिरात विविध आजारांसाठी तज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी, उपचार आणि शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा एका ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा हा अभिनव प्रयत्न ठरणार आहे.

या आरोग्य शिबिरात खालील आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व उपचार कॅन्सर विकारांचे निदान व उपचार, नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया (लायन्स क्लब, परतुर यांच्या सहकार्याने) व हृदयविकार उपचार व सल्ला स्त्रीरोग व वंध्यत्व निवारण सेवा, बालरोग तज्ञांची मोफत सल्ला सेवा, मेंदू व मणका विकारांचे निदान, श्वसन व छाती विकारांवरील उपचार, अस्थिरोग तज्ज्ञांकडून तपासणी, पोट व लिव्हर विकारांचे निदान, अ‍ॅपेंडिक्स, हर्निया व इतर शस्त्रक्रियांचे मार्गदर्शन व उपचार

डॉ. कृष्णा कोरडे कलावती हॉस्पिटल, जालना व त्यांची सुपर स्पेशालिस्ट टीम, डॉ. धनंजय घुगे - कॅन्सर तज्ञ व त्यांची अनुभवी टीम, डॉ. प्रफुल पाटील हेल्थ सर्व्हिसेस टीम, परभणी तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांची आरोग्य विभागातील टीम असे मात्तबर डॉक्टर या शिबिरात सहभागी होणार आहे.

या आरोग्य शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे मोफत तपासणी, उपचार, औषधे आणि आवश्यक रुग्णांना पुढील वैद्यकीय साहाय्याची सोय करण्यात येणार आहे.

आमदार मा. बबनराव लोणीकर यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. प्रत्येक नागरिकापर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे परतुर मतदारसंघातील सर्व नागरिकांनी या महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा.

या भव्य आरोग्य शिबिरातून परतुर मतदारसंघात जनतेच्या आरोग्यजागृतीस नवी दिशा मिळणार आहे. शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर यांचे एकत्रित प्रयत्न म्हणजेच जनसेवेतील आरोग्यसेवा - याचे उत्तम उदाहरण या शिबिरातून दिसून येणार आहे.

# 'टीईटी' परीक्षेबाबत पुनर्विचार याचिका दाखल करावी

## मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** सर्व कार्यरत शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा अनिवार्य करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे देशातील शिक्षण क्षेत्रात गोंधळ निर्माण झाला आहे. हा संभ्रम दूर करण्यासाठी अखील भारतीय माध्यमिक शिक्षक संघाने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी, अशी मागणी केली आहे.

संघाचे अध्यक्ष इंद्रशेखर मिश्रा व सरचिटणीस जी. सदानंद गौड यांनी या संदर्भात निवेदन सादर केले. मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, या निर्णयामुळे देशातील सुमारे ४० लाख शिक्षकांवर परिणाम होणार असून शिक्षण विभागात गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे.

संघाने म्हटले आहे की, २३ ऑक्टोबर २०१० पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांना टीईटीमधून सुट देणे आवश्यक आहे, कारण त्या वेळी त्यांनी आवश्यक पात्रता पूर्ण करूनच सेवा गाठली आहे. दोन वर्षांत टीईटी न केल्यास सेवामुक्त करण्याचे आदेश न्यायालयाने दिल्याने तातडीने पुनर्विचाराची गरज आहे.

तामिळनाडू सरकारने आधीच पुनर्विचार याचिका दाखल केली असून, महाराष्ट्र सरकारनेही तत्काळ अशीच याचिका दाखल करावी, अशी मागणी अखील भारतीय माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष इंद्रशेखर मिश्रा, सरचिटणीस जी. सदानंद गौड, कार्याध्यक्ष माजी शिक्षक आमदार कट्टी नरसिंह रेड्डी व मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी केली आहे.

# ओबीसीतील लहान घटकांना समान न्याय हक्क मिळविण्यासाठी रोहीणी आयोगाची अंबलबजावणी करावी

## बारा बलुतेदार महासंघाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** राज्यात बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार भटके विमुक्त जाती जमाती व या जात समूहातील जाती आजही पुरातन काळापासून आपली पारंपारिक कला जोपासत असून त्याद्वारे आपला उदारनिर्वाह करीत आहे व प्रामाणिकपणे कष्ट करीत आहे म त्र सामाजिक विषमता शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय सहभाग आज पर्यंत या घटकांना मिळालेला नाही त्यामुळे बारा बलुतेदार पारंपारिक व्यवसाय उद्योगांचा सार्वजनिक विकास झाला नाही आणि महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही शासनाने आजपर्यंत तसे आयोगाच्या निर्मिती तुन ठोस उपाययोजना चिंतन तसेच आर्थिक सशक्तिकरणासाठी लक्ष केंद्रित केलेले दिसून येत नाही त्यामुळे भारत देश स्वातंत्र्यानंतर ही राज्यांमध्ये मायक्रो ओबीसीतील बारा बलूतेदारांवर संवेधानिक अन्याय सुरूच आहे.त्यामुळे या दुर्लक्षित घटकांच्या उन्नतीसाठी मुख्यमंत्रांनी केंद्राकडे अहवाल पाठवून राज्यातील बाराबलुतेदार घटकातील समाज बांधवांना न्याय द्यावा या मागणीचे निवेदन बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष कल्याण दळे व पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले.



निवेदनात पुढे असे नमूद करण्यात आले आहे की .मंडळ आयोगाच्या शिफारशीनुसार १९९० मध्ये ओबीसींना सरसकट २७ टक्के आरक्षण लागू करण्याची शिफारस करण्यात आली त्यानुसार सरकारने ओबीसींना सरसगट आरक्षण लागू करण्याची शिफारस मान्य करून त्या आधारावर सरकारी नोकऱ्या व शिक्षण संस्था मधील प्रदेशात आरक्षण मिळू लागलेया २७ खल्यांमध्ये राज्यातील मोठ्या संख्येने असलेल्या दहा जातींना जवळपास ८५ टक्के आरक्षणाचा फायदा घेतला असून उर्वरित ३७५ जातींना १५ टक्क्यात बसावे लागले व या १५ टक्क्यात आलुतेदार बलुतेदार फक्त १.५ टक्के आरक्षणाचा फायदा घेऊ शकले तरी आरक्षणांपासून वंचित राहिलेल्या अति मागास व दुर्गम ओबीसी जातींना २७ टक्के कोठ्याम ध्ये प्राधान्य मिळावे यासाठी सशक्त समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी आरक्षणातील हा अन्याय दुर करण्यासाठी तसेच ओबीसी प्रवर्गातील यादी प्रभावशाली जातींसाठी एक मर्यादा निश्चित करून या प्रवर्गातील कम जोर जातींना आरक्षणाचा लाभ दिला जावा यासाठी २ ऑक्टोंबर २०१७ मध्ये नेमण्यात आलेल्या सर्वोच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधिस रोहीणी आयोगाच्या अवाहलाची अंमलबजावणी त्वरीत होण्यासाठी ओबीसींच्या २७ टक्के कोट्यामध्ये बारा बलुतेदार व म यक्रो ओबीसींना ९ टक्के आरक्षण मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने केंद्राकडे शिफारस करण्यात यावी या मागणीचे निवेदन बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष कल्याण दळे व पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे .

दरम्यान यासाठी आपण लवकरच बारा बलुतेदार तथा अठरा आलुतेदार भटके विमुक्त जाती जम ाती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन या विषयी तोडगा काढून ओबीसी प्रवर्गातील लहान लहान जातींना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदाधिकाऱ्यांना आश्वासन दिले असल्याची माहिती बारापर्यंत महासंघाचे अध्यक्ष कल्याणराव दळे यांनी सांगितले.

# सर्मपित स्वयंसेवक घडवणे संघाच ध्येय -प्रशांत कुलकर्णी

**परतूर । प्रतिनिधी -** या राष्ट्रावर आलेल्या प्रत्येक आपतीवर व समस्यावर सर्मपणभावाने धावुन जाणारा स्वयंसेवक तयार करणे संघाच काम आहे असे प्रतिपादन प्रशांत कुलकर्णी यांनी केले ते रा.स्व.संघाच्या विजयादशमी उत्सवात बोलत होते.



पुढे बोलताना ते म्हणाले,रा. स्व.संघावर गेल्या १०० वर्षात अनेक टिका सहन कराव्या लागल्या परंतु या राष्ट्राला परम वैभवाला नेण्याचे ध्येय समोर ठेवुन डॉ.हेडगेवार यांनी संघाची स्थापना केली.डॉ. हेडगेवार स्वतः स्वांतत्र्य संग्राम ात अग्रणी होते कलकत्ता मधील क्रांतिकारी गटाचे ते सदस्य होते.स्वातंत्र्यनंतर हिंदुची काय अवस्था होईल असा दुरगामी विचार करुन संघाची स्थापना केली.आज संघाच्या माध्यमातून अनेक सेवा प्रकल्प चालवले जातात आणि याच सेवाकार्याच्या आधारावर संघ शताब्दी वर्ष पुर्ण करत आहे.येणाऱ्या काळात स्वयसेवकांना विविध अभियान रावबुन संघाचे पुढे न्यायचे आहे आणि राष्ट्ला परम वैभवत्व प्राप्त करुन देण्याचा जबाबदारी स्वयंसेवकाची आहे.

प्रमुख पाहुणे डॉ.गोपीकिशनजी बांगड यांनी ठीॆ म्हणजे राष्ट्र,सेवा आणि स्नेह राष्ट्राची सेवा करत जनतेच स्नेह प्राप्त करुन संघ शताब्दी साजरी करत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संघाचा विजयदशमी उत्सव थाटात साजरा करण्यात आला.४०० गणवेषधारी स्वयंसेवकाच्या शिस्तबद्ध संचलनाव्दारे शहराचे वातावरण संघमय झाले होते. संचलन मार्गावर मातृशक्तीव्दारा रांगोळी काढुन व पुष्पवृष्टी करुन स्वागत करण्यात आले.

व्यासपीठावर प्रमुख वक्ते प्रशांत कुलकर्णी, डॉ.गोपीकिशन बांगड व परतुर तालुका संघचालक डॉ. प्रमोद आकात उपस्थित होते.

# महिलेला शिवीगाळ व जीव मारण्याची धमकी

## हसनाबाद येथील रीना शिंदेची पोलिसांत धाव



**जालना । प्रतिनिधी -** भोकरदन तालुक्यातील हसनाबाद येथील रीना मिलिंद शिंदे या महिलेला जालना शहरातील सेशन कोर्ट परिसरात शिवीगाळ करून जीवे म ारण्याची धमकी देण्यात आली असल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, संबंधित घटनेत नातेवाईकांकडून वाद निर्माण करून शिवीगाळ तसेच गंभीर स्वरूपाच्या धमक्या देण्यात आल्या. या घटनेनंतर घाबरलेल्या शिंदे यांनी थेट पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी नॉन-कॉग्निझेबल रिपोर्ट (NCR) नोंदवून तपास सुरू केला आहे. रीना शिंदे यांनी आज जालना येथील रेस्ट हाऊस परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, मला आणि माझ्या कुटुंबीयांना या नातेवाईकांकडून जीवाला धोका आहे. त्यामुळे पोलिसांनी मला योग्य तो न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. सदर घटनेचा पुढील तपास तालुका पोलिस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.